# मुखत्यारपत्राचे अधिप्रमाणन

## Authentication

विषय ओळख (About)

नोंदणी अधिनियम,**1908** चे कलम 32 नुसार दस्त नोदंणीस सादर करणे तसेच कलम 34 नुसार, दस्तावरील निष्प्पादन दुय्यम निबंधक कार्यालयात जाउन कबुल करणे इत्यादी कामकाजाकरीता, मुळ मालक त्याचे प्रतिनिधी/ प्रतिनिधीला मुखत्यारपत्र देउ शकतो. जेणेकरुन, मुखत्यारपत्र देणार यास दुय्यम निबंधक कार्यालयात जाण्याची आवश्यकता राहत नाही.

अशा स्वरुपाचे मुखत्यारपत्र निष्पादीत करतेसमयी, मुखत्यारपत्र देणार, भारतातील ज्या भागात रहात आहेत, तो भाग ज्या दुय्यम निबंधक कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात येत आहे, अशा दुय्यम निबंधक कार्यालयात जाउन करणे आवश्यक असते. तसेच भारताबाहेर राहत असतील तर, त्या देशातील भारताचे राजदुतावास कार्यालयात जाउन करणे आवश्यक असते

अशा कुलमुखत्यारपत्रावर दुय्यम निबंधक याचेसमोर निष्पादन/सही केल्यास व त्यांना ओळखत असलेल्या दोन ओळखदार उपस्थीत केल्यास, दुय्यम निबंधक असे मुखत्यारपत्र अधिप्रमाणित करतात. यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी< मुखत्यारपत्र< विशेष मुखत्यारपत्र पहावे.